# नागरी सहकारी बँकांमधील कर्मचारी संचालकांसाठी कार्यशाळा

# दि. ७,८ सप्टेंबर, २००९

# अहवाल

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने नागरी सहकारी बँकांमधील कर्मचारी संचालकांसाठी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा **दि. ७,८ सप्टेंबर, २००९** या कालावधीत **प्रबोधिनीच्या ज्ञान नैपुण्य केंद्र ,** उत्तन, भाईंदर येथे संपन्न झाली ,या कार्यशाळेत महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांमधून १७ सहकारी बँकामधून ३१ कर्मचारी संचालक ( ३० पुरुष, १महिला) सहभागी झाले होते.

नागरी सहकारी बँका सध्या एका विशिष्ट परिस्थितीतून मार्गक्रमण करीत आहेत. आर्थिक उदारीकरण, ग्लोबल बँकिंग, स्पर्धात्मक वातावरण, विलिनीकरणाची प्रक्रिया, रिझर्व्ह बँकेचे धोरण, बदलती अर्थव्यवस्था इ. च्या पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँकांना पुढील काळात स्वतःची रणनीती ठरवावी लागेल. काळाची गरज ओळखून तंत्रज्ञानाचा उपयोग, मनुष्यबळाचे नियोजन, वित्तीय सामर्थ्य यांच्या आधारे धोरणात्मक नियोजन करण्याची आवश्यकता आहे. बँकेत नोकरी करत असतांना देखील संचालक म्हणून एक वेगळी भूमिका कर्मचारी संचालकांची आहे. या संदर्भात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनासोबत कर्मचारी संचालकांनी चर्चा करुन सद्य परिस्थितीत काय उपाय योजना करता येतील, याचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन रिझर्व्ह बँकेच्या नागरी सहकारी बँक विभागाचे महाव्यवस्थापक श्री. एल.एम.कांबळे यांनी केले. उद्घाटन सत्रात त्यांनी ''**नागरी सहकारी बँकांमधील परिस्थिती**'' या विषयावर सहभागींना मार्गदर्शन केले. त्यांनी मार्च, २००८ च्या रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार नागरी सहकारी बँकाची सद्यस्थितीची पुरेशी कल्पना सहभागींना करुन दिली. सोबत क्रार, टायर-१ आणि टायर-२ अशा तांत्रिक संज्ञा त्यांनी सोप्या करुन सांगितल्या. कर्मचारी संचालक बँकेत कर्मचारी म्हणून कायम असणारच आहेत तेव्हा त्यांनी इतर संचालकांना बँकेचे अहित करणारे निर्णय घेवू देवू नयेत. तसेही रिझर्व्ह बँकेचे धोरण नागरी सहकारी बँकाबाबत नरमाईचेच असते... आदी महत्त्वपूर्ण बाबी त्यांनी सांगितल्या.

''**सहकारी बँक : मनुष्यबळ व्यवस्थापनात मूलभूत बदलांची आवश्यकता** ''या सत्रात रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच जनसेवा बँक,बोरिवलीचे संचालक श्री. अरविंद रेगे यांनी मार्गदर्शन केले. समाजातील सर्व घटकांनी एकदंर मनुष्यबळाचा विचार एका वेगळ्या दृष्टीकोनातून म्हणजेच मनुष्याला काम करणारे हात अथवा वस्तू न मानता, मनुष्याला संपूर्ण मनुष्य म्हणून पाहावे ( मन, बुद्धी, आत्मा असलेली व्यक्ती ) आणि तसेच वागवावे यावर त्यांनी भर दिला. कोणाही मनुष्याचे जन्माला येणे फुकट नसते. प्रत्येकाला काहीतरी देणगी असते. ती ओळखून त्यानुसार त्याला काम देवून, त्याच्यामधील कला गुणांचा विकास करावा , एकदंर मनुष्य क्षमतांचे विकसन करावे. कर्मचारी संचालकांनी आपल्या बँकेतील इतर सहकाऱ्यांचे पालकत्व स्वीकारावे, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावे, आदी मूलभूत बाबींवर श्री. रेगे यांनी भर दिला.

''**वाटाघाटी व संवादकौशल्ये** ''यामध्ये आपला संवाद कसा प्रभावी करता येईल? यावर श्री. अरविंद रेगे यांनीच मार्गदर्शन केले. मुळात संवादकौशल्ये म्हणजे विविध कौशल्यांचा संच आहे. माणूस हळू हळू एखाद्या कामात पारंगत होतो. या करिता त्यांनी सायकल चालविण्याचे उदाहरण दिले. जसे कोणीही सुरुवातीला घाबरत – घाबरत सायकल चालवितो नंतर मात्र अगदी दोन्ही हात सोडून सुद्धा सायकल चालविता येते. तसेच सर्व कौशल्यांचे असते. यानंतर संवाद कौशल्यात काय असावे व काय नसावे याचा उत्कृष्ट नमुना असलेला ''**एक रुका हुआ फैसला** '' हा सिनेमा सर्वांना दाखविण्यात आला . नतंर त्यामधील विविध पात्रांच्या संवादकौशल्यावर चर्चा करण्यात आली.

पहिल्या दिवसाचे शेवटचे सत्र ठाणे जनता सहकारी बँकेचे महाव्यवस्थापक सतीश उतेकर यांनी घेतले. त्यांनी "**आधुनिक तंत्रज्ञान व मानसिकता** "या विषयावर आपले विचार मांडले. मुळात बदलत्या युगात तंत्रज्ञानाची कास धरण्याखेरीज पर्याय नसल्याने सकारात्मक दृष्टया या सर्वांचा विचार व्हावा असे त्यांनी सांगितले. कोअर बँकिंग करण्यासाठी कर्मचारी क्षमता विकसन करणे, ग्राहक केंद्रीत व्यवहार असणे इत्यादी बाबीवर त्यांनी भर दिला.

दुसऱ्या दिवशीची सुरुवात अरविंद रेगे यांच्या चर्चासत्राने झाली, पहिल्या दिवशीच्या सत्रांतील विषयांची उजळणी करण्यात आली. त्याचबरोबर ठाणे जनता सहकारी बँकेचे कर्मचारी संचालक व व्यवस्थापक श्री. गोपाळ गांगल यांनी त्यांच्या बँकेत कोअर बँकिंग सुरु करतानांचा व अन्य बँकांच्या विलिनीकरणाचा स्वतःचा अनुभव सर्व सहभागी समोर मांडला. त्यानतंर सहभागींनी भरपूर प्रश्न विचारुन शंका निरसन करुन घेतले.

या नंतरचे सत्र "**परस्पर संबंध** " या विषयावर होते. सध्या सल्लागार म्हणून कार्यरत असलेले, १५ वर्षे युनियनचे नेतृत्व केलेले व काही काळ व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेले श्री. संजय खांबेटे यांनी घेतले. त्यांनी आदल्याच दिवशी सहभागींना सोडविण्यासाठी प्रश्नपत्रिका दिली होती. मानवी स्वभावाची एकूणच जडण घडण कशी होते, स्वभावात किती विविधता असते, किती विभिन्न टोकाचे स्वभाव असतात हे त्यांनी सोदाहरण सांगितले. नंतर प्रत्येकाने सोडविलेल्या प्रश्नांच्या आधारे त्यांची व्यक्तिमत्त्व कशी आहेत याचे विवेचन केले. सहभागींनी उत्साहाने आप आपल्या स्वभावाचे विश्र्लेषण समजून घेतले.

मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हरिश शेट्टी यांनी "**तणाव व्यवस्थापन** "या विषयांवर सहभागींशी संवाद साधला. मुळात आपण आपल्या भावना ओळखाव्यात तसेच त्यांचा समजून उमजून अनुभव घ्यावा. स्वतःच्या भावना-विचार-वर्तन यांच्यात सुसंगती आल्यास तणाव व्यवस्थापन करण्यास मदत होते. म्हणजे प्रचंड राग आला तर लागलीच "*हो मला प्रचंड राग आला आहे*"असे स्वीकारावे तसेच तो का आला हा विचार करावा, नंतर योग्य ठिकाणी मन मोकळे करावे. कशा रितीने तणाव मुक्त राहावे ? याचे त्यांनी सहभागींना मार्गदर्शन केले.

समारोपाच्या सत्रात मा. खा. आनंदराव अडसूळ यांनी सहभागींना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी कर्मचारी संचालकाने नेमके काय करावे ? रिझर्व्ह बँकेची धोरणे ही सहकार क्षेत्रासाठी तितकीशी हितकारक नसून त्यांमध्ये काही बदल अत्यंत गरजेचा आहे तसेच तुमची परिस्थिती चांगली असेल व ओळख असेल तरच रिझर्व्ह बँकेत दाद लागते असा अनुभव ही सांगितला. एकदंर सहकारी बँक म्हणजे *खाजगी जहागीर* असा जो एक दृष्टीकोन अलीकडच्या काळात वाढीला लागला आहे तो ही सहकारी क्षेत्राला अत्यंत घातक असून कर्मचारी संचालकांनी सावध असणे काळाची गरज बनली आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.

सहभागींनी हा अभिनव प्रयोग भावल्याचे दर्शविले तसेच काहींनी असेच प्रशिक्षण सहकारी बँकामधील संचालकांसाठी सुद्धा ठेवावे असा आग्रह धरला.

पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

*********